# वैयक्तिक व कौटुंबिक समस्यांसाठी मुलांना मार्गदर्शन करा

**प्रार्थना:** "प्रिय प्रभु मुलांनी योसेफाप्रमाणे आपल्या कुटुंबातील सदस्यांशी प्रेमाने वागावे याकरिता त्यांचे साहाय्य कर."

सध्याच्या गरजांना अनुरूप असे कोणतेही शैक्षणिक कार्यक्रम निवडा. मुलांना उंटांच्या तांड्याचे चित्र काढायला सांगा. अशाच एका तांड्यातून योसेफ इजिप्त देशात गेला.



मोठ्या मुलाने किंवा शिक्षकाने थोडक्यात योसेफ व त्याच्या भावांच्या कथा वृत्तांतातील मुख्य मुद्यांची उजळणी करावी. यांचीच संतती पुढे इस्राएलाचे वंश झाले **( उत्पत्ती अध्याय 37 व 39 ते 46 ).**

- योसेफाला त्याच्या वडिलांनी याकोबाने यालाच इस्राएल असेही म्हणत एक सुंदर झगा शिवला होता त्यामुळे त्याचे भाऊ त्याचा द्वेष करीत (हा योसेफ म्हणजे मरीयेचा पती नव्हे).
- आपले भाऊ आपल्याला नमन करतील असे स्वप्न योसेफाला पडले म्हणून त्याचे भाऊ त्याचा मत्सर करीत.
- त्यांनी योसेफाला ठार मारण्याचा कट केला. पण त्याऐवजी त्यांनी त्याला परदेशी व्यापाऱ्यांना गुलाम म्हणून विकून टाकले.
- मिसराच्या राजाचा कारभारी पोटीफरने योसेफाला विकत घेतले आणि योसेफाने त्याची सूज्ञपणे सेवा केली.
- योसेफाची पीछेहाट झाली त्याच्यावर अन्याय झाला; पण कालांतराने राजाच्या फारोच्या बाजूने तो अधिकार पदावर विराजमान झाला.
- दुष्काळाच्या काळात त्याचे भाऊ धान्य खरेदी करण्यासाठी त्याच्याकडे आले पण त्यांनी त्याला ओळखले नाही.

योसेफाने त्यांचे पैसे परत केले पण पुढच्या वेळी न विसरता धाकट्या बन्यामिनाला घेऊन येण्यास बजावले. योसेफाचे भाऊ सर्वात धाकट्या बन्यामिनाला घेऊन मिसरला परत आले; तेव्हा योसेफाने काय केले याविषयी **उत्पत्ती 44 व 45:1-15** मधील वृत्तांतातून सांगा किंवा नाट्यीकरण करा.

**प्रश्न** कथा वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचार:

बन्यामिनाच्या (पोत्यात) धान्याच्या गोणीत काय ठेवावयास योसेफाने आपल्या कारभाऱ्यास सांगितले? (पाहा उत्पत्ती 44:2)

चांदीचा प्याला एखाद्याने चोरला तर त्याला काय शिक्षा दिली जात असे? (पाहा उत्पत्ती 44:10)

योसेफाप्रमाणे त्या भावांनी बन्यामिनाला टाकून दिले का? (नाही. पाहा उत्पत्ती 44:33).

आपण केलेल्या कृत्याचा भावांना पश्चात्ताप झाला का? (होय पाहा उत्पत्ती 44:34)

आपल्या भावांशी बोलताना योसेफाला काय वाटले? (पाहा उत्पत्ती 45:2)

योसेफाने आपल्या भावांना क्षमा केली का? (पाहा उत्पत्ती 45:15-16)

योसेफ आणि त्याचे भाऊ ह्यांच्या कथा वृत्तांताचे नाट्यीकरण करा. मुलांना ही नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.

मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी **निवेदक, यहूदा कारभारी व योसेफ** ह्या भूमिका करण्यात योसेफकडे पोते द्या.

**लहान मुलांनी बन्यामिन** व इतर **भाऊ** ह्या भूमिका करण्यात भावांकडे धान्याची पोती द्या.

**निवेदक:** उत्पत्ती 44:1-13 मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगा. आणि मग म्हणा, "योसेफ आपल्या कारभाऱ्याला काय म्हणतो ते ऐका."

**योसेफ:** "कारभारी, हा पेला घ्या आणि त्या सर्वात धाकट्या भावाच्या धान्याच्या पोत्यात ठेवून द्या."

**कारभारी:** पेला घेऊन बन्यामिनाच्या पोत्यात लपवा.

**भाऊ:** (चाला) "देवाचे खूप उपकार झाले! ह्या मिसरच्या लोकांनी आपल्या भुकेल्या कुटुंबियांसाठी धान्य दिले म्हणून बरे."

**कारभारी:** बन्यामिनच्या मागे धावत जा आणि म्हणा "तुम्ही माझ्या धान्याचा पेला चोरून घेतला आहे! पाहा, तुमच्या पोत्यात पेला आहे. याची शिक्षा म्हणून तुम्हांला गुलाम व्हावे लागेल!"

**भाऊ:** खिन्न उदास मनाने परत जा. म्हणा "आता आपण गुलाम होणार" "आपण योसेफाला दिलेल्या वागणूकीची देव आपल्याला शिक्षा करीत आहे."

**निवेदक:** उत्पत्ती 44:14-34 मधून वृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, "यहूदा योसेफाला काय विनंती करतो ते ऐका."

**यहूदा:** "माझे स्वामी कृपा करून मला बन्यामिनाच्या ऐवजी आपला दास म्हणून ठेवून घ्या तो घरी परत गेला नाही तर माझे वडील फार दु:खी होतील!"

**निवेदक:** उत्पत्ती 45:1-15 मधून वृत्तांताचा तिसरा भाग सांगून म्हणा, "योसेफ काय म्हणतो ते ऐका."

**योसेफ:** "माझ्या भावांनो, मला खूप आनंद झाला आहे! तुम्ही माझे वाईट केलेत पण देवाने त्यातून चांगलेच घडविले तुमची व तुमच्या कुटुंबियांची काळजी घेण्यासाठी देवाने मला येथे आणले. मी तुम्हांला क्षमा केली आहे!"

**निवेदक किंवा मोठे मूल:** मदत करणाऱ्यांचे आभार माना.

प्रश्न विचारा-मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसाठी सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी प्रौढांना विचारावेत.

कुटुंबातील सदस्यांच्या कोणत्या गोष्टीमुळे एकमेकांना दु:ख होते ते दुखावले जातात, हे कागदांच्या छोट्या तुकड्यांवर लिहा.

हे सर्व कागदाचे तुकडे एका वाटीत ठेवा आणि ह्या वाईट गोष्टींची देवाला क्षमा करण्यास सांगा.

कागदाचे तुकडे जमिनीवर टाकून ह्या सर्व गोष्टी आपण कशा प्रकारे देवाला देतो ते दाखावा.

मग आम्हांला दुखाविणाऱ्यांना क्षमा करून त्यांच्यावर प्रेम करण्यास साहाय्य मिळावे, यासाठी पुन्हा देवाकडे प्रार्थना करा.

**चित्र:** मुलांसाठी एक पोत्याचे चित्र काढा. मुलांनी हे चित्र काढून पुढच्या उपासनेच्या वेळी ते प्रौढांना किंवा आपल्या आई वडिलांना दाखवून स्पष्टीकरण करावे यावरून आम्ही कुटुंबातील सदस्यांना कशी क्षमा करतो आणि एकमेकांबद्दलचा आकस कसा दूर ठेवतो हे समजते आम्हांला वाटणारा आकस आम्ही पोत्यात भरून देवाला देतो. आमची सर्व पातके दूर करतो.



**चर्चा करा:** आपल्याच कुटुंबातील सदस्यांनी पूर्वी केलेल्या गोष्टींमुळे आपण दुखावले जातो अशावेळी त्यांना क्षमा करावी, याची आणखी उदाहरणे सांगा?

**मुलांच्या वैयक्तिक समस्या समजून घ्या:**

- समजा एखाद्या मुलाला काही समस्या असतील तर त्याच्या एकट्या बरोबर काही वेळ व्यतीत करा.
- त्यांच्या समस्यांचे मूळ कारण शोधून काढण्यासाठी काळजीपूर्वक त्यांचे म्हणणे ऐका. साहाय्यासाठी प्रार्थना करा.
- ते आरंभी पुष्कळदा नुसत्याच वरवर तक्रारी करतात त्या ऐकण्यापेक्षा मूळ समस्या समजून घ्या.
- समस्येची पातळी नेमकी काय आहे समस्या कोठे आहे ते समजून घ्या. आवश्यकता असेल तर आई वडिलांशी बोला.
- समस्येच्या केवळ लक्षणांपेक्षा तिच्या कारणाचा शोध घेऊन त्याला देवाचे वचन लागू करा.
- एकावेळी एक सोपे पाऊल उचलण्यास सांगून मुलांना त्यांची वागणूक बदलण्यास मदत करा.
- एखाद्या मुलाला वाईट वाटत असेल तर ते लक्षात घ्या. काही जणांना स्वत:विषयी वाईट वाटते का? ते देवाचे मूल असल्याची त्यांची खात्री पटवा. देव त्यांना क्षमा करतो, तसेच त्यांच्यावर प्रेम करतो हे ही सांगा.
- काही मुले फक्त लक्ष वेधून घेण्यासाठीच वाईट वागतात, अशा मुलांना इतर मुलांची अथवा त्यांच्या आईवडिलांची सेवा करण्यासाठी काही गोष्टी करण्यास द्या. त्यांच्या कामाची वाहवा करा. त्यांना शाबासकी द्या.
- मोठ्या मुलांनी लहानांना सोबत घेऊन काम करावे. मोठ्या मुलांनी "मोठे भाऊ" म्हणून लहान मुलांची सेवा करून त्यांना शिस्त लावावी. प्रत्येक मुलाला असा एक "मोठा भाऊ" असावा.

**म्हणा.** पांच मुलांनी फिलिप्पै 2:5-9 यामधून प्रत्येकी एक वचन म्हणावे.

**मोठ्या मुलांनी कुटुंबातील सदस्यांना** क्षमा करण्याविषयी कविता गाणी किंवा नाटिका लिहाव्यात.

**पाठ करा इफिस. 4:32**

**प्रार्थना:** "प्रिय प्रभु आम्हांला दुखावणाऱ्या आमच्याच कुटुंबातील सदस्यांना क्षमा करणे अवघड आहे. आम्हांला क्षमा करण्यास साहाय्य कर"

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net